पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**ग** प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - २
सभावृत्तांत

दिनांक - ४/०९/२०१७ वेळ दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा **सोम**वार दि.०४/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.बारणे अर्चना तानाजी
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.ऍड भोसले सचिन सुरेश
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.निलेश हिरामण बारणे
१०.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
११. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१२.मा.सुनिता हेमंत तापकीर
१३.मा.चंद्रकांत बारकु नखाते

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

**श्री.**श्रीनिवास दांगट- क्षेत्रिय अधिकारी/प्रशासन अधिकारी, श्री.प्रमोद ओंबासे – कार्य.अभियंता स्थापत्य, श्री.संदेश चव्हाण – कार्य.अभियंता विद्युत, श्री.भाऊसाहेब साबळे –उप अभियंता पाणीपुरवठा, श्री.एस एस कुळकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग, श्री.निंबाळकर – उपअभियंता –स्थापत्य, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता – विद्युत, श्री.ओव्हाळ – उपअभियंता-स्थापत्य, श्री.जाधव - उपअभियंता – स्थापत्य त्याचप्रमाणे आरोग्य निरीक्षक, कनिष्ठ अभियंता इ.कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती**- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

अ) दि. ०९/०८ /२०१७ चे मासिक सभेचा ग प्रभाग समिती सभापती पदाचे निवडणुक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. १ ) कायम करणेत येत आहे.

-------

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक- १

दिनांक- ४/९/२०१७

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा. श्री.अभिषेक बारणे यांचे दि.३१ /०८/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक १) मा.श्री.अभिषेक बारणे यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

१) प्रभाग सभागृहाला 'ग्रामदैवत बापुजीबुवा सभागृह' नामकरण करण्यात यावे.

२) सफाई कर्मचारी वाढविणे.

३) सफाई वाहने (Ace) वाढविणे.

४) मोकाट कुत्रीबाबत प्रभागासाठी वेगळी गाडी घेणे.

५) प्रभागात धुर /पावडर नियमित करणे.

६) प्रभागात धुर गाडीची संख्या वाढविणे.

७) ड्रेनेज सक्शन गाडी व ड्रेनेज दुरुस्ती बाबत गाडी वाढवणे.

८) मैला वाहतुक गाडी वाढविणे.

९) नागरी सुविधा केंद्रे निर्माण करणे.

१०) पावसामुळे रस्त्यास पडलेले खड्डे त्वरीत बुजविणे.

११) कचरा व साफसफाई करणे. प्रभागामध्ये सफाई टिम तयार करुन स्वच्छता मोहिम राबविणे.

१२) प्रभागामधील हॉटेल व्यावसायिक करीता रात्री १२ वाजेनंतर जमा होणारा हॉटेल वेस्ट कचरा उचलणे बाबत दररोज कार्यवाही करणे.

१३) सीसीटीव्ही कॅमेरे चौकात, रस्त्यावर, मुख्य रस्त्यावर व कचरा टाकण्याच्या जागेवर इ.ठिकाणी बसविणे.

१४) कुठेही मुख्य रस्त्यावर कचरा कुंडया ठेवु नये. कचरा कुंडया विरहित प्रभाग

करणे.

१५) प्रभागात मॉडेल कचरा पेटी बसविणे, कॉलनीचे नाव, सुचना फलक, सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे.

**उपरोक्त विषयांवर सखोल चर्चा होऊन** सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - **३** विषय क्रमांक- २

दिनांक- ४/९/२०१७

सूचक- मा.अर्चना बारणे अनुमोदक- मा.कैलास बारणे

संदर्भ – मा. मनिषाताई प्रमोद पवार यांचे दि. ३१/८/२०१७ चे पत्र.

मा.मनिषाताई प्रमोद पवार यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

१) प्रभाग क्रमांक २३ मधील रस्ते नुतनीकरण व दुरुस्ती करुन मिळावी.

२) संपुर्ण प्रभागामध्ये कॉंक्रीट ब्लॉक नवीन बसविणे व दुरुस्ती करुन मिळणेबाबत.

३) प्रभागामध्ये चौकांना नवीन नाम फलक बसविणेबाबत..

४) प्रभागामध्ये विजेचे नवीन पोल व त्यावरती दिवे बसवुन मिळावे.

५) प्रत्येक चौकामध्ये हायमास्ट दिवे बसवुन मिळणेबाबत.

६) प्रभागामध्ये दैनंदिन कचरा व्यवस्थापन व नवीन वाहन व्यवस्था करुन मिळणेबाबत..

७) प्रभागामध्ये नवीन वृक्षारोपण व असलेल्या झाडांसाठी संरक्षक गार्ड, कुंपण व कॉंक्रीट आळी करुन मिळणेबाबत..

**उपरोक्त विषयांवर सखोल चर्चा होऊन** सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---

ठराव क्रमांक - **४** विषय क्रमांक - ३

दिनांक- ४/९/२०१७

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.मनिषा पवार

संदर्भ – मा. अर्चना तानाजी बारणे यांचे दि.३१/८/२०१७ चे पत्र.

मा.अर्चना बारणे यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

१) प्रभाग क्र.२३ मधील थेरगाव गावठाण स्मशान भूमी मधील सुशोभिकरण करण्याबाबत व ई (स्नान गृह व शौचालय)

२) प्रभागातील पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन २० वर्षापुर्वीच्या जुन्या असुन पाण्याच्या पाईप लाईन पुर्णपणे गंजलेल्या अवस्थेत आहेत त्यांचे नुतनीकरण होण्याबाबत..

३) लोकवस्ती मोठया प्रमाणात वाढल्यामुळे पुर्वी लहान व्यासाच्या सांडपाणी वाहुन नेणा-या वाहिन्यांवर जास्त दाब येत असल्यामुळे त्या मोठया व्यासाच्या बनवण्याची गरज भासत आहे ती पुर्ण करुन मिळण्याबाबत..

४) ग प्रभाग कार्यालय समोरील शिवाजी पुतळा येथील सुशोभीकरण करण्याबाबत..

५) थेरगाव येथील स्मशान भूमी मध्ये पाण्यासाठी बोरवेल ची व्यवस्था करुन देण्याबाबत..

उपरोक्त विषयांवर सखोल चर्चा होऊन सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे**

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ४

दिनांक- ४/९/२०१७

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा.सविता खुळे

मा.सुनिता हेमंत तापकीर यांचे दि.४/०९/२०१७ चे पत्र.

मा.सुनिता हेमंत तापकीर यांनी सादर केलेल्या विषयपत्रानुसार खालील कामांना मान्यता देणेबाबत विचार करणे.

वॉर्ड क्र.२७ तापकीरनगर रहाटणी काळेवाडी येथील पुढील समस्यांबाबत उपाययोजना करण्याबाबत..

१) कच-याची समस्या

२) भटक्या कुत्र्यांचा व डुकरांचा उपद्रव

३) रस्त्यांवर जागोजागी पडलेल्या खड्डयांबाबत

४) ड्रेनेज सफाई

५) नाले सफाई

उपरोक्त विषयांवर सखोल चर्चा होऊन सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ५

दिनांक- ४/९/२०१७

सूचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कैलास बारणे

मा.अभिषेक बारणे व मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव..

गाव मौजे रहाटणी येथील सर्व्हे नं.४ मधील झालेल्या प्राथमिक शाळेला आजतागायत नाव देण्यात आलेले नाही. तरी सदर शाळेला पुर्वी कै.नथु नारायण नढे यांनी आपल्या महानगरपालिकेच्या शाळेला जागा दिलेली होती. त्यामुळे सदर शाळेचा एक भाग म्हणुन कै. नारायण सखाराम नढे प्राथमिक मुलांची शाळा" असे नामकरण करण्यात यावे.

त्याचप्रमाणे याच शाळेला लागुन असलेली मिळकत श्री.संभाजी बारकु नखाते यांची आहे. तरी ते आपल्या महानगरपालिकेच्या शाळेला शेजारील मोकळी जागा देण्यास तयार आहे. त्याबद्दल काही प्रमाणात कार्यवाही चालु असल्याने श्री.संभाजी बारकु नखाते यांच्या इच्छेनुसार त्यांची आई "कै.सुमन बारकु नखाते प्राथमिक कन्या शाळा" असे नामकरण करण्यात यावे. तरी सदर शाळेचा नामांकनाचा विषय मंजुर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**दि.४/९/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.चंद्रकांत नखाते –** ग प्रभाग समिती सभेसाठी तयार करणेत आलेल्या सभागृहामध्ये माईकची व्यवस्था करणेत यावी. सदर हॉल सभागृह म्हणुन तयार करतांना ही बाब लक्षात घ्यायला हवी होती. सदर ठिकाणी लिफ्ट बसविणेत यावी.

ग प्रभाग सभागृहास ग्रामदैवत श्री.बापुजी बुवा सभागृह असे नाव देण्यात यावे असे सर्वानुमते मान्य झाले.

सफाई कामगारांची संख्या वाढविणेत यावी. ग प्रभागामध्ये प्रत्येक वॉर्डमध्ये ८ ते १० दिवस सर्व्हे करावा व किती सफाई कर्मचारी कमी पडतात ते पहावे. प्रभाग क्र.२४ मध्ये ३३ सफाई कामगार आहेत, अजुन २५ सफाई कामगार हवे आहेत.

सार्वजनिक ठिकाणी स्टीकर चिटकवणा-यावर गुन्हा दाखल करा.
ठराविक वॉर्डमध्येच कचरा गोळा करणा-या गाडया आहेत.
प्रत्येक वेळी पुढच्या मिटींगला नवीन विषय घेऊन मागच्या मिटींगचा विचार केला जात नाही. परंतु प्रत्येक वेळी मागच्या मिटींगचा विचार केला जावा. सदर विषयांवर Implement झाले कि नाही याची खातरजमा करण्यात यावी.

प्रभाग क्रमांक २१ मध्ये किती घंटागाडया व किती टेम्पो आहेत याची सविस्तर माहिती देण्यात यावी.
डासांचे प्रमाण वाढले आहे, त्यासाठी काय तरतुद केलेली आहे.

**मा.सचिन भोसले** - प्रभाग क्र.२४ मध्ये ८ कचरा गाडया आहेत, त्यापैकी ४ अद्ययावत आहेत व ४ नादुरुस्त आहेत. याकरीता ३-४ महिन्यापासुन सांगुनही त्यावर अंमलबजावणी झालेली नाही.
नवीन गाडयांचे आरटीओ रजिस्ट्रेशन राहिले आहे असे सांगण्यात आले होते, सदर गाडया लवकरात लवकर पाठविणेत याव्या. ११ गाडया हव्या आहेत.

**मा.संदिप वाघेरे** – पिंपरी येथे डुकरे, कुत्रे इ.जनावरे जास्त प्रमाणात झालेय. सदर मोकाट जनावरांवर निर्बंध घालणेत यावे.

**प्रभाग क्र.२३** – प्रभाग क्र.२३ येथे नियमीत सफाई कामकाज होत नाही.

**मा.अर्चना बारणे** - प्रभाग क्र.२७ मध्ये ५ घंटागाडया आहेत, सदर गाडया डिझेल नाही म्हणुन येत नाही असे सांगण्यात येते. कचरा उचलला जात नाही, कचरा वेळोवेळी उचलण्यात यावा. एखाद्या गल्लीमध्ये कच-याची गाडी परत पाठविणेत यावी तसेच सफाई कर्मचा-यांची संख्या वाढविणेत यावी. सदर बाबीचा खुलासा करावा.

**पडवळ नगर प्रभाग क्र. २३** - साफसफाई कर्मचारी येत नाही.
आठवडयातील एक वार ठरवुन घेऊन प्रत्येक प्रभागात पाहणी करुन Implement करण्यात यावे. असे आदेश देण्यात आलेले आहेत.
प्रभागात नागरी सुविधा केंद्र सुरु करण्यात यावे.
दर सोमवारी औषध फवारणी झाली पाहिजे असे नियोजन करण्यात येऊन तसे टाईमटेबल बनविण्यात यावे.
ड्रेनेज सक्शन गाडयांची संख्या वाढवण्यात यावी.

**मा.अर्चना बारणे** – सक्शन गाडयांची संख्या वाढविणेत यावी.

**मा.सचिन भोसले** –गाळ काढणेसाठी गाडया कमी आहेत.

**मा.संदिप वाघेरे** - प्रत्येक प्रभागात १ सक्शन गाडी असायला हवी. प्रभागामधील ड्रेनेज लाईन्स अतिशय जुन्या असुन त्या वाळु, खडी व कचरा जाऊन वारंवार चोकअप होतात, त्या बदलण्यात याव्यात. सक्शन गाडीसाठीची प्रोव्हीजन काय आहे, याचा आढावा घ्यावा.

ब प्रभागात असलेली गाडीच आता ग प्रभागासाठी वापरणेत येत आहे. अपेक्षीत गाडयांची संख्या विचारात घेऊन नवीन गाडया खरेदी करण्यात याव्यात.
ग क्षेत्रीय कार्यालयासाठी कमीत कमी दोन सक्शन गाडया पाहिजे.

**मा.झामाबाई बारणे** – बैठी घरांमध्ये चेंबर फुल झाल्याने पाणी येते. २ गाडया देण्यात याव्यात. अशी मागणी आहे.
ग प्रभागामध्ये नागरी सुविधा केंद्र व माई सेवा केंद्र सुरु करण्यात यावे.

पावसामुळे रस्त्यांवर अनेक खड्डे होतात

BRT Road - १६ नंबर

२३ ड्रायव्हर कॉलनी येथे खड्डे झालेत..त्यात पावसाचे पाणी साचुन राहते. त्यामुळे अपघात होतात.

**मा.संदिप वाघेरे** – पिंपरी मध्ये रस्ते नाहीत, रोड केलेला नाही.

वाकड रोड येथे मध्यभागी खड्डे आहेत, त्यासाठी लवकरात लवकर उपाययोजना करावी.
प्रभागात सर्व ठिकाणी पहाणी करण्यात यावी.

**मा.सुनिता तापकीर** – स्पीड ब्रेकर्सची उंची जास्त असल्यामुळे देखील अपघात होण्याची शक्यता असते, त्यामुळे स्पीड ब्रेकर्सची उंची ही नियमाप्रमाणे ठेवण्यात यावी. वाजवीपेक्षा अधिक स्पीड ब्रेकर्स नसावे. जेथे स्पीड ब्रेकर्स तयार करण्यात आलेले आहेत, तेथे व्हाईट पट्टे देण्यात यावे. स्थापत्य विभागाने याकडे लक्ष द्यावे.
ग प्रभागातील प्रत्येक कार्यकारी अभियंत्यांस सुचना देण्यात याव्या.

**श्री.ओंबासे** – सुरुवातीला बीबीएम पध्दतीने खड्डे बुजविण्यात येतील, एक आठवडयाच्या आत काम करुन घेतो.
स्पीड ब्रेकर्स ची पहाणी करुन घेतो.
रायगड कॉलनी, गणेश नगर येथील स्पीड ब्रेकर काढुन घेण्यात यावा.

**मा.कैलास बारणे** – १६ नंबर ते काळेवाडी फाटा, येथील स्टॉर्म लाईनचे झाकण तुटलेले आहे (गणेश मंगल केंद्र समोर) त्याची दुरुस्ती करण्यात यावी.
कार्यकारी अभियंता, नगरसेवक यांनी एकत्र येऊन पहाणी करावी.

**मा.अभिषेक बारणे** – ज्या ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा आहे, तो लवकरात लवकर काढणेत यावा.
गुरुवारी सकाळी ८ वाजता सर्व्हे करण्यात येईल.
पिंपरी चिंचवड परिसरात मोठया प्रमाणावर हॉटेल व्यावसायिक आहेत. सदर हॉटेलमधील कचरा हा रात्री बारा वाजेनंतर मोकळया जागेत फेकला जातो. रात्री १.३० ते २.०० पर्यंत सदर कचरा उचलण्याची व्यवस्था ज्या त्या वॉर्डमध्ये करण्यात यावी.

सर्व हॉटेल व्यावसायिकांना तसे आदेश देण्यात येवुन लवकर त्यावर अंमलबजावणी करण्यात यावी.

**मा.बाबासाहेब त्रिभुवन** - हॉटेल व्यावसायिकांना तशी नोटीस देण्यात यावी. 2nd Shift व Night Shift च्या लोकांना ते त्रासदायक ठरते. विना परवाना असलेले हॉटेलधारकांना Notice देण्यात यावी.

**सीसीटीव्ही कॅमेरा बसविणेबाबत** –

**मा.सुनिता तापकीर** – डी मार्ट समोर असलेल्या भुयारी मार्गामध्ये सीसीटीव्ही कॅमेराज बसविण्यात यावे. सदर कॅमेराचे फुटेज हे काळेवाडी पोलिस स्टेशन ला कळविण्यात यावे. प्रशासन अधिका-यांनी जवळच्या पोलिस स्टेशनला एक पत्र द्यावे.

जुन्या नगरसेवकांचे बोर्ड काढण्यात यावे, जुने बोर्ड असल्यामुळे नागरीकांना नवीन नगरसेवक कोण असलेचे समजणे कठीण होते.

दगडु पाटील नगर येथील बोर्ड काढणेत यावा.

ग प्रभाग ऑफीस येथील प्रवेशव्दाराजवळही कचरा आहे, तो काढणेत यावा.

ज्या बोर्ड् मुळे रस्त्यातील वाहतुकीला अडथळा होत आहे, ते बोर्ड काढण्यात यावे.

माजी नगरसेवकांचे बोर्ड काढणेबाबत मागील पंचवार्षिक योजनेत काय केले गेले, याचा आढावा घ्यावा.

**मा.निलेश बारणे** – रस्त्यातील सुशोभिकरणाच्या ठिकाणी बोर्ड उभे करु नये.

दुकानदारांनीही जे बोर्ड व शेड्स रस्त्यात लावलेले आहेत, ते काढणेत यावे.

बस स्टॉप वर जाहिरातींचे स्टीकर्स लावलेले असतात त्याऐवजी तेथे स्वच्छतेचे स्लोगन लावणेत यावे.

बस स्टॉपला लागुन असलेल्या भाजीच्या गाडया काढणेत याव्या.

सदर बाब ही PMPML च्या अधिपत्याखाली असल्यामुळे महानगरपालिका त्याबाबत निर्णय घेऊ शकत नाही. याबाबत माहिती घेण्यात यावी.

थेरगाव गावठाण स्मशान भूमि येथील सुशोभिकरण करण्यात यावे. त्यासाठी उद्यान विभागाकडुन काम करुन घ्यायला हवे.

सार्वजनिक ठिकाणी स्टीकर चिटकवणा-यावर गुन्हा दाखल केला जावा.

भटकी व मोकाट जनावरांचा प्रश्न सोडवण्यात यावा.

पिंपरीतील क्रिडा मैदानास नाव देण्यात यावे. ज्या ठिकाणास नाव दिलेले नाही, त्यालाच नाव देण्यात यावे.

बंद पडलेले स्ट्रीट लाईट्स दुरुस्तीकरीता गाडी उपलब्ध करुन देऊन स्ट्रीट लाईट्स लवकरात लवकर चालु करुन देण्यात यावे.

प्रभागात सर्व ठिकाणी पाण्याचा प्रश्न आहे. त्यावर योग्य उपाययोजना करण्यात यावी.

प्रत्येक महिन्याच्या सभेसाठी कार्यकारी अभियंता हजर असायला हवेत. पुढील सभेसाठी सर्व अधिकारी वेळेत हजर असायला हवेत.

शहरातील चोरीचे प्रमाण वाढत आहे, त्यासाठी सीसीटीव्ही कॅमेराज प्रत्येक चौकात बसवायला हवेत.
यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
ग प्रभाग समिती
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/१/ ३ /२०१७
दिनांक- ११ /०९/२०१७

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
क्षेत्रीय कार्यालय,
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.